<u>अतितात्काळ</u>

अ.शा.पत्र क्रमांक -मित्र /औरंगाबाद /५/२०१२,
सामान्य प्रशासन विभाग,
मादाम कामा रस्ता, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.
दिनांक - ८ मे २०१२.

डॉ. पी.एस.मीना
ान सचिव (साविस व विचौअ-२)
दू.क्र. ०२२-२२८४३७११

प्रिय श्री. कदम,

शासन परिपत्रक क्रमांक संकीर्ण-२०११/२९६/११-मशि-३, दिनांक ५ ऑक्टोबर २०११ नुसार राज्यातील सर्व प्राथमिक व माध्यमिक शाळांमधून साधना वर्ग सुरु करण्याचे आदेश देण्यात आले आहेत. याच बरोबर शासकीय परिपत्रक क्रमांक संकीर्ण २०११/२९६/११-मशि-३, दिनांक २७ जानेवारी २०१२ नुसार सविस्तर सूचना देण्यात आलेल्या आहेत. हा उपक्रम सुरु झाला असून या अंतर्गत जवळपास प्रत्येक जिल्हयातील किमान १०० शिक्षक यात सहभाग घेत आहेत. जून २०१२ मध्ये शाळा सुरु झाल्यावर हे शिक्षक आपापल्या शाळेतील विद्यार्थ्यांना आनापान शिकवतील.आनापान शिकविण्याबाबत सविस्तर माहिती व घ्यावयाची काळजी या बाबत मार्गदर्शक पुस्तिका श्री. अभ्यंकर, निवृत्त संचालक, शिक्षण विभाग, विपश्यना विन्यास यांनी तयार केलेली आहे व ती आपणास पाठविली आहे. कृपया आपण ती त्वरित छापून घ्यावी जेणेकरुन मित्र उपक्रम सुरु केलेल्या जवळपास ६००० शाळांमध्ये किमान ३ पुस्तिका उपलब्ध होतील, हे पहावे..

सस्नेह

आपला स्नेहांकित

पीएसमीना

( पी.एस.मीना)
राज्य समन्वयक मित्र उपक्रम

श्री.एम.आर.कदम,
शिक्षण संचालक (प्राथमिक),
महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद,
४०८-ब, रा. ब. कुंठेकर मार्ग,
सदाशिव पेठ, पुणे-१